# राष्ट्रीय आरोग्य अभियान

## जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी,
## जाहिरात क्र. १ /२०२५ (दि.२५/०२/२०२५)

जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, चंद्रपूर राष्ट्रीय आरोग्य अभियानामध्ये जिल्हयात राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांसाठी खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे कंत्राटी तत्वावर रिक्त पदांसाठी पात्र उमेदवारांकडुन अर्ज मागविण्यात येत आहेत.

| Sr. No. | Name of Post | No. of Posts | Required Category | Qualifiication | Remuneration Rs. (Per Month Consolidated) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Accountant | 5 | ST- 1, VJ (A)-1, OBC -1, EWS -1, SEBC -1 | B.Com, Tally | 18000/- |
| 2 | Staff Nurse | 31 | SC-1, ST-8, VJ (A)-1, NT (C)- 3, NT (D)-1, SBC-2, OBC-7, EWS -3, SEBC- 3, OPEN - 2 | G.N.M./B.Sc. Nursing | 20000/- |

वरीलप्रमाणे रिक्त पदे भरण्याकरिता जाहिरात **https://zpchandrapur.co.in/** या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली असुन अर्ज करावयाच्या पध्दतीबाबत सर्व साधारण सुचना/माहीती तसेच अर्जाचा नमुना देण्यात आलेला आहे. वरील पदांकरिता अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख दि.०6/03/२०२५ रोजी सायं. ४.०० वाजेपर्यत राहील. त्यानंतर प्राप्त होणारे अर्ज स्विकृत करण्यात येणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

Signed by
Ashok Tukaram Katare
Date: 05-02-2025 16:55:43

**सदस्य सचिव**
जि.ए.आ.व कु.क.सोसायटी तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद, चंद्रपूर

Signed by
Vivek Johnson
Date: 12-02-2025 17:12:39
जि.ए.आ.व कु.क.सोसायटी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, चंद्रपुर

# राष्ट्रीय आरोग्य अभियान, जिल्हा चंद्रपूर

## जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी,

जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, चंद्रपूर राष्ट्रीय आरोग्य अभियान, अंतर्गत कंत्राटी तत्वावर रिक्त पदे भरण्याकरिता जाहिरात क्र. १ (दि.२५/०२/२०२५) जिल्हा परिषद चंद्रपूरच्या https://zpchandrapur.co.in/ या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येत असुन अर्ज करावयाच्या पध्दतीबाबत सर्वसाधारण सुचना/माहीती खालीलप्रमाणे देण्यात आलेल्या आहे.

अटी व शर्ती-

१) वरील सर्व पदे ही कंत्राटी स्वरुपाची एकत्रित मानधनाची असुन मा. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांच्या मार्गदर्शक सुचनांनुसार व राष्ट्रीय आरोग्य अभियान पुढे सुरु राहिल्यास पुनर्नियुक्तीव्दारे वाढविण्याची कार्यवाही केली जाईल.

२) वरील नमुद सर्व पदे ही राज्यशासनाची पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपाची पदे आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागु नाही.

३) केंद्र /राज्य शासनाने संबंधित पदे नामंजूर केल्यास उमेदवाराची सेवा कोणतीही पुर्वसुचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येईल व याबाबत कुठलीही तक्रार व गऱ्हाणी ऐकुण घेण्यात येणार नाही.

४) उच्च शैक्षणिक अर्हता व अनुभव असलेल्या उमेदवारांस निवड प्रक्रियेमध्ये प्राधान्य दिले जाईल. कामाचा अनुभव हा शासकीय/निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थांचाच ग्राहय धरण्यात येईल. तसेच संगणक अर्हता आवश्यक असलेल्या पदाकरीता उमेदवारांची मराठी व इंग्रजी टायपींगची संगणक चाचणी घेण्यात येईल.

५) अ.क्र. २ चे स्टॉफ नर्स या पदाकरिता B.SC.Nursing / P.B.B.Sc च्या उमेदावारांना प्राधान्य देण्यात येईल.

६) जाहिरात प्रसिध्द झाली त्या दिवशीची वयोमर्यादा :- १) वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे व राखीव प्रवर्गासाठी ४३ वर्षे राहील २) राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या सेवेतील कार्यरत कर्मचाऱ्यांकरीता कमाल सेवा प्रवेश मर्यादा ५ वर्षापर्यंत शिथील राहील.

७) शासन सेवेतुन सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी कमाल वयोमर्यादा ६५ वर्षे राहील. तथापी संबंधितांनी जिल्हा शल्य चिकीत्सक यांचे शारिरीक व मानसिक दृष्टया सक्षम असल्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहील.

८) उपरोक्त पदांपैकी तांत्रिक पदांकरिता उदा. स्टाफ नर्स पदांकरिता तत्सम कौन्सिलचे वैध नोंदणी प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील. अन्यथा उमेदवारांस अपात्र ठरविण्यात येईल.

९) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरिक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणतेही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

१०) सदर रिक्त पदांच्या संख्येत तसेच पदस्थापनेच्या ठिकाणामध्ये बदल होऊ शकतो. यामध्ये सर्व अधिकार हे या कार्यालयाचे असुन निवड प्रक्रियेत कोणत्याही क्षणी बदल करण्याचे अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचेकडे राखुन ठेवण्यात आलेले आहे.

११) उमेवारांस एकापेक्षा जास्त अर्ज सादर करावयाचे असल्यास प्रत्येक पदांकरिता स्वतंत्र अर्ज करावा लागेल. अर्ज करीत असलेल्या पदाचे नांव व सामाजिक आरक्षणानुसार सदर पदाकरिता नमुद प्रवर्ग (जातीचा प्रवर्ग) अर्जामध्ये स्पष्टपणे नमुद करावा.

१२) सदर रिक्त पदांसाठी आवश्यक पात्रता असलेला अर्जदार न मिळाल्यास किंवा आवश्यक त्या संख्येत अर्जदार न मिळाल्यास त्या पदाकरिता असलेली पात्रता (अर्हता व अनुभव) आवश्यकतेनूसार शिथील करण्यात येईल. तसेच राखीव प्रवर्गाचे उमेदवार पुरेशा प्रमाणामध्ये उपलब्ध न झाल्यास पदांच्या भरतीची आवश्यकता लक्षात घेता प्रतिक्षा यादीतील उमेदवाराला खुल्या प्रवर्गात तात्पुरती नेमणुक देण्यात येईल.

१३) राखीव संवर्गातून अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी त्या संवर्गाची वैध प्रमाणपत्रे (Caste Certificate/Validity Certificate) जोडणे आवश्यक आहे. वैध प्रमाणपत्र नसलेल्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही व अशा उमेदवारांना राखीव संवर्गाचा लाभ येणार नाही.

➢ अर्जासोबत सादर करावयाच्या आवश्यक कागदपत्रांच्या स्वःसाक्षांकित केलेल्या छायांकित प्रती –

१) पदाकरिता आवश्यक शैक्षणिक अर्हता उत्तीर्ण झाल्याचे अंतिम वर्षाचे गुणपत्रक (Final Year Marksheet) सेमिस्टर पध्दत असल्यास अंतिम वर्षामधील सर्व सेमिस्टरच्या मार्कशिट जोडण्यात याव्यात. तसेच ईतर आवश्यक प्रमाणपत्रे २) शाळा सोडल्याचा/जन्मतारखेचा दाखला. ३) अनुभवाची प्रमाणपत्रे. ४) जात प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेअर ५) तांत्रिक पदांकरिता तत्सम कौन्सिलचे वैध नोंदणी प्रमाणपत्र.

➢ अर्ज करण्याची पध्दत –

१) इच्छुक उमेदवारांनी यासोबत देण्यात आलेल्या अर्जाच्या नमुन्यात A4 Size आकाराच्या पांढऱ्या जाड कागदावर प्रिंट करुन सुवाच्य अक्षरात भरलेला अर्ज आवश्यक सर्व कागदपत्रांसह सादर करावा.

२) खुल्या प्रवर्गातील मेदवारांनी रु. १५०/- व राखिव प्रवर्गातील उमेदवारांनी रु. १००/- चे राष्ट्रीयकृत बॅकेचे डिडि अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. सदर डिडि मागे उमेदवाराने स्वतःचे नांव व अर्ज केलेल्या पदांचे नांव लिहावे.

३) सदर डिडि (Demand Draft) **District Interated Health & Family Welfare Society, Chandrapur** या नावाने काढावा.

४) उमेदवारांनी उपरोक्त प्रमाणे संपूर्ण दस्ताऐवज लिफाफयामध्ये सिलबंद करुन अर्ज करीत असलेल्या पदाचे नाव तसेच उमेदवाराचे संपूर्ण नाव, पत्ता व मोबाईल क्रमांक लिफाफयावर नमुद करुन सादर करावे.

५) उमेदवारांनी आपले अर्ज जिल्हा एनएचएम कार्यालय, जिल्हा क्षयरोग रुग्णालय परीसर, रामनगर चंद्रपूर येथे दि. ०७/०३/२०२५ सायंकाळी ४.०० वाजेपर्यत कार्यालयीन वेळेत सुट्टीच दिवस वगळुन पोस्टाव्दारे किंवा व्यक्तीशः सादर करावे. त्यानंतर प्राप्त होणारे अर्ज स्विकृत करण्यात येणार नाही, यांची उमेवारांनी नोंद घ्यावी.

➢ खालीलप्रमाणे उणिवा असलेले अर्ज अपात्र करण्यात येतील –

१) विहित पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज.

२) शासकीय कर्मचारी/एनएचएम कर्मचारी यांचेवर पूर्वीच्या कार्यकाळात कुठल्याही स्वरुपाचे प्रशासकीय व वित्तीय कार्यवाही, दंडात्मक कार्यवाही किंवा फौजदारी अथवा इतर कुठल्याही प्रकारचे गंभीर गुन्हयाची नोंद असलेल्या उमेदवारांचे अर्ज.

३) विहित नमुन्यात नसलेले किंवा योग्य प्रकारे न भरलेले अर्ज.

४) आवश्यक मजकुर अपूर्ण किंवा चुकीचा भरलेला अर्ज, खाडाखोड केलेला अर्ज.

५) अर्जावर स्वाक्षरी नसलेले, आवश्यक गुणपत्रकांच्या व प्रमाणपत्रांच्या स्वसाक्षांकीत प्रती नसलेले, अवाश्यक शुल्काचे डिडि न जोडलेले अगर तत्सम माहिती योग्य रित्या न दर्शविलेले अर्ज.

उपरोक्त पदांकरीता निवड प्रक्रिया ही प्राप्त अर्जाची छाननी करुन पात्र ठरणाऱ्या उमेदवारांकरीताच राबविण्यात येईल. पात्र/अपात्र उमेदवारांची यादी तसेच सदर पदभरती संदर्भातील वेळोवेळी प्रकाशित करण्यात येणाऱ्या सुचना फक्त जिल्हा परिषद चंद्रपूर च्या संकेतस्थळावर (वेबसाईडवर) (**https://zpchandrapur.co.in/**) तसेच अर्ज केलेल्या ठिकाणी नोटीस बोर्डवर प्रकाशित करण्यात येईल. याची वेगळी सुचना उमेदवारांना दिली जाणार नाही, याची सर्व उमेदवारांनी नोद घ्यावी.

Signed by
Ashok Tukaram Katare
Date: 05-02-2025 16:56:38

सदस्य सचिव
जि.ए.आ.व कु.क.सोसायटी तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद, चंद्रपूर

Signed by
Vivek Johnson
Date: 12-02-2025 17:12:10

अध्यक्ष
जि.ए.आ.व कु.क.सोसायटी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, चंद्रपुर

# National Health Mission

**District Integrated Health & Family Welfare Society, Chandrapur**

## APPLICATION FORM

(*All fields in the forms are mandatory to be filled. An incomplete form submitted will be treated as rejected.*)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **Name of Post Applied for :** | | | | |
| Full Name of Candidate : | | | | |
| Father's / Husband's Name: | | | | |
| Date of Birth (DD/MM/YYYY): | | Blood Group: | Gender: | |
| Marital Status: | Existing NHM (YES/NO) | Nationality: | Religion:<br><br>Category: | Applying Category : |

Address/ Contact Details: (Name of the District and Pin code is compulsory)

| | |
|---|---|
| Address (present):<br><br>State:<br>Pin :<br>Contact No: | Address (permanent):<br>(write same if same as present Address)<br><br>State:<br>Pin :<br>Contact No: |
| E-mail Id for Correspondence: | Alternate E-mail Id for correspondence (If any): |
| **DD Details** – Bank Name- ………………………… | DD No. - …………………… Rs. ………. |

| Languages Known: (Write Y/N) | English | Hindi | Marathi | Others (please Specify below) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

| Computer proficiency: |
|---|
| |

Academic/Professional Education Summary: (Starting from most recent)

| From (MM/YY) | TO (MM/YY) | Degree/Diploma | University/ Institute | Specialization/ Subjects | Final year | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | Total Marks | Marksobtained | % of Marks |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

**Work / Experience Summary: (Staring from Current / most recent)**

| Sr. No. | From (MM/YY) | TO (MM/YY) | Organization | Designation | Responsibilities (Min. 30 and Max. 50 Words) |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| Total Experience (In Years &Months): | | | | Relevant Experience to the post applied (in years & Months): | |
| | | | | Notice period / Joining Time (Days) : | |

| Details of Internship / Workshops/ Conferences/ Trainings Attended (If any): |
|---|
| |

***Declaration:***

*I hereby declare that all statements made in the application are true, complete and correct to the best of my knowledge and belief. I understand that in the event of any information being found untrue/false/incorrect or I do not satisfy the eligibility criteria my candidature will be cancelled, without assigning any reason thereof. I have read the content of the advertisement and agree to abide by the rules, regulations and procedures for appointment to the post applied for.*

*Place:Name of Candidate :*

*Date: Signature :*

**Disclaimer:**

The applicants are required to submit the duly filled application on or before the due date and time, failing which the application of the said applicant shall be treated as non-responsive. NHM shall not be responsible for late receipt or non-receipt of application/s for any technical reason or whatsoever. The applications received after due date and time shall not be considered.

**Checklist** (परिक्षण यादी)

| | | |
|---|---|---|
| उमेदवाराचे नांव - | | |
| पदाचे नांव - | | |
| अ.क्र. | अर्जासोबत सादर करावयाच्या आवश्यक कागदपत्रांच्या स्वःसाक्षांकित केलेल्या छायांकित प्रती | जोंडण्यात आलेले कागदपत्र होय/नाही |
| १ | उमेदवाराचा अर्ज | |
| २ | पदाकरिता आवश्यक अर्जानुसार पदवी/पदवीकाचे अंतिम वर्षाचे गुणपत्रिका (Final Year Marksheet) | |
| ३ | उच्च शैक्षणिक अर्हता | |
| ४ | सेमिस्टर पध्दत असल्यास अंतिम वर्षामधील सर्व मार्कशिट | |
| ५ | शाळा सोडल्याचा/ जन्म तारखेचा दाखला. | |
| ६ | जात प्रमाणपत्र | |
| ७ | नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र | |
| ८ | तांत्रिक पदांकरिता तत्सम कौन्सिलचे वैध नोंदणी प्रमाणपत्र | |
| ९ | अनुभव प्रमाणपत्र | |
| १० | डिडि जोडण्यात आलेला आहे | |

उमेदवाराची स्वाक्षरी